
# अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क




- संदीप [illegible]
- डॉ. प्रशांत [illegible]
- डॉ. शरद [illegible]

# अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क

संदीप तुंडूरवार

डॉ. प्रशांत विघे

डॉ. शरद सांबारे

सहसंपादक

डॉ. रायन महाजन

डॉ. भास्कर वघाळे

डॉ. नितीन कायरकर

डॉ. नागेश्वर कन्हाके

AVISHA
अविशा प्रकाशन

अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क

मुख्य संपादक
संदीप तुंडूरवार
डॉ. प्रशांत विघे
डॉ. शरद सांबारे

.............................................

सहसंपादक
डॉ. रायन महाजन
डॉ. भास्कर बघाळे
डॉ. नितीन कायरकर
डॉ. नागेश्वर कन्हाके

.............................................

प्रकाशक
"अविशा प्रकाशन"
८४, खामला, नागपुर - २५

.............................................

मुखपृष्ठ
सी.डी. शिवणकर
स्कॅन डॉट कॉम्प्युटर, महाल, नागपूर

.............................................

अक्षर जुळवणी
स्कॅन डॉट कॉम्प्युटर, महाल, नागपूर
मोबा. ९८२२५६५७८२

.............................................

किंमत : २०० रु.

.............................................

दिनांक : १ एप्रिल २०२३

.............................................

ISBN : 978-93-94577-36-7

## परीक्षण समिती

डॉ. संजय गोरे, राजुरा
डॉ. वकील शेख, नागपूर
डॉ. श्रीकांत शेंडे, नागपूर
डॉ. राम बुटले, बोरी अरब
डॉ. भुपेंद्र घरत, नागपूर
प्रा. किशोर नैताम, नागपूर
प्रा. विजय पंधरे, नागपूर
डॉ. राजेंद्र मुद्दमवार, राजुरा
डॉ. दिनकर चौधरी, भिसी
डॉ. संतोष डाखरे, भामरागड
डॉ. नंदाजी सातपुते, गडचिरोली
डॉ. राहूल चुटे, भंडारा
प्रा. धनंजय पोशट्टीवार, नागपूर

# अनुक्रमणिका

■ अल्पसंख्यांक आणि भारतीय संविधानातील तरतुदी - डॉ. धर्मेंद्र तेलगोटे, डॉ. प्रशांत विघे / ९
■ सो क्यों मंदा अखिए जित जम्मे राजान - **विनीत कौर** / १६
■ महिला स्वातंत्र्याच्या कक्षेत मानवी हक्क - **डॉ. विनोद गायकवाड** / २१
■ भारतातील अल्पसंख्यांक महिला आणि समस्या - **डॉ. संतोष संभाजी डाखरे** / २८
■ अल्पसंख्यांक आयोगाचे घटनात्मक स्थान आणि आव्हाने - **डॉ. अमर कृ. बोंदरे** / ३५
■ अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क - **डॉ. संजय गोरे** / ४३
■ अल्पसंख्यांक समुदायातील महिलांसाठी घटनात्मक तरतुदी व
वास्तविकता - **डॉ. वकील टी. शेख, डॉ. राहुल प्रकाश चुटे** / ४७
■ मुस्लिमधर्मीय महिलांचे प्रश्न आणि मानवी हक्क - **डॉ. प्रिया भानूदास बोचे** / ५६
■ अल्पसंख्यांक महिला आणि मानवी हक्क - **डॉ. ममता विजयराव पाध्रीकर** / ६१
■ भारतीय संविधान आणि अल्पसंख्यांकांचे हक्क विषयक तरतुदी -
एक दृष्टीक्षेप - **डॉ. राजेंद्र ओ. वेलोकार** / ६९
■ भारतातील अल्पसंख्यांक महिलांना भेडसावणाऱ्या समस्या - **डॉ. व्ही. एच. भटकर** / ७५
■ अल्पसंख्यांक समाजवभारतीय संविधानातील तरतुदी - डॉ. व्ही.बी. चांदजकर / ८६
■ अल्पसंख्याक महिलाबाबत भारतीय संविधानातील
तरतुदी - **डॉ. नितीन कायरकर, डॉ. सचिन भोगेकर** / ९१
■ उत्तराधिकाराच्या संदर्भाने हिंदु, मुस्लीम व ख्रिश्चन महिलांचे मानवाधिकार - **डॉ. दिपक दामोदर** / ९९
■ अल्पसंख्यांक महिलांचे महाराष्ट्राच्या राजकीय पटलावरील प्रतिनिधीत्वाच्या
अभावाची कारणमीमांसा -**डॉ. शरद सांबारे, डॉ. रायन महाजन** / १०३
■ मानवी अधिकार व महिलांचे प्रश्न - **प्रा. अरूण मुकुंदराव शेळके** / ११०
■ अल्पसंख्यांक महिला मानवी हक्कांची भारतातील वास्तविकता - **प्रा. चंद्रमणी भोवते** / ११४
■ मुस्लिमधर्मीय महिलांचे प्रश्न आणि मानवी हक्क - प्रा. किशोर एन. नैताम, **डॉ. भुपेंद्र घरत** / ११८
■ भारतीय मुस्लिम स्त्रियांचे मानवाधिकार : राज्यशास्त्रीय अध्ययन - राजु पा. लिपटे / १२५
■ अल्पसंख्याक शीख समुदायातील महिलांची सामाजिक
स्थिती - **डॉ. भास्कर सुभाष वघाळे, डॉ. श्रीकांत गोपीचंद शेंडे** / १३१
■ जैन महिलाचे मानव अधिकार - **सरिता चोरे** / १३७
■ अल्पसंख्यांक मुस्लीम महिला आणि त्यांच्यात असलेली तिहेरी
तलाकाची प्रथा : एक सामाजिक आकलन - **प्रा. विजयकुमार पंधरे**, प्रा. **धनंजय पोशट्टीवार** / १४०
■ अल्पसंख्यांक महिलांचे वर्चविश्व आणि
मानवी हक्क - **संदीप तुंडूरवार, डॉ. शुभांगी बोंपीलवार, डॉ. राम बुटले** / १५९

# अल्पसंख्यांक आणि भारतीय संविधानातील तरतूदी

❒ डॉ. धर्मेंद्र तेलगोटे

बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा, ता. घाटंजी जिल्हा यवतमाळ

❒ डॉ. प्रशांत विघे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, भारतीय महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना**

भारत देशामध्ये विभिन्न संस्कृती संपन्न लोकसमुदाय असलेला देश आहे. या देशात विविध जाती, विभिन्न धर्म, विभिन्न भाषा, विभिन्न प्रांत असा बहुविविधतेने नटलेले लोक आहेत. परंतु भारतीय समाजात बहुसंख्य विविध जातीयुक्त असा हिंदू समाज असला तरी, या एकूण समाजातील जवळपास १९ टक्के समाज हा 'अल्पसंख्यांक' आहे; अर्थात भारतीय संविधानात अल्पसंख्य कोणाला म्हणायचे, याबाबतीत स्पष्टता दिलेली नाही. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग अधिनियम १९९२ (National Commission for Minorities Act, 1992) मधील कलम २ (क) नुसार केंद्र शासनाने अधिसूचित केलेले, तसेच महाराष्ट्र राज्य शासनाने राज्य अल्पसंख्यांक आयोग अधिनियम २००४ मधील कलम २ ड नुसार सहा समुदाय अल्पसंख्यांक लोकसमूह घोषित केले आहेत. त्यामध्ये मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, जैन आणि पारशी या धर्मसमूहांना अल्पसंख्यांक समाजाचा दर्जा देण्यात आला आहे.[1] याबरोबरच भाषा आणि वंश यावर आधारित अल्पसंख्यांक समूह निश्चित केले आहेत. अल्पसंख्यांक समाजाला भारतीय नागरिक म्हणून सर्व अधिकार प्रदान केलेले आहेतच. भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेतील धर्मनिरपेक्षता, भारतीय संविधानातील तरतुदी, अल्पसंख्यांक समाजाचा संविधानिक इतिहास, शिवाय अल्पसंख्यांक समूह म्हणून काही विशेष अधिकार देण्यात आले आहेत. त्याचा आढावा प्रस्तुत प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे.

२६ जानेवारी १९५० ला भारतीय संविधान अमलात आल्यानंतर उद्देशपत्रिकेमध्ये धर्मनिरपेक्षता हा शब्दप्रयोग करण्यात आला होता.[2] भारतीय संविधानात स्वातंत्र्योत्तर भारत धर्मनिरपेक्ष असला, तरी भारतातील बहुसंख्य समाज हा धार्मिक आहे हे वास्तव स्वीकारून संविधानात अनुच्छेद २५ नुसार धर्मस्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार

जनतेला बहाल करण्यात आला. मात्र, आपण सर्वांनी हे लक्षात घ्यायला हवे की, संविधानातील धर्मस्वातंत्र्य हे धर्माला नसून ते व्यक्तीला आहे. धर्मस्वातंत्र्य म्हणजे कोणतीही धर्मश्रद्धा स्वीकारणे, त्याचे आचरण करणे, तसेच प्रसार करण्याचा अधिकार, याबरोबरच एखाद्याला कोणताही धर्म नाकारण्याचा किंवा निधर्मी राहण्याचा अधिकार अनुच्छेद २५ नुसार दिला आहे. या अधिकारालाच सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य असेही म्हटले जाते. त्याबरोबरच धर्मस्वातंत्र्य हे अमर्याद स्वरूपाचे नसून, या स्वातंत्र्यावर काही मर्यादा आहेत. समाजातील शांतता, सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक नीतिमत्ता याच्या आड न येणारे हे धर्मस्वातंत्र्य आहे. हे जाणीवपूर्वक समजून घेतले पाहिजे, कारण आज प्रत्येक जण धर्मस्वातंत्र्याचा अर्थ स्वतःच्या सोईप्रमाणे काढताना दिसतो. ज्यामुळे प्रसंगी देशातील निकोप आणि सामंजस्यपूर्ण समाजात गालबोटही लागले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर असे म्हणतात, मी आपणास असे स्पष्ट सांगू इच्छितो की, मनुष्य धर्मासाठी नाही तर धर्म हा माणसासाठी आहे. जगात माणसापेक्षा कोणतीही गोष्ट श्रेष्ठ नाही. धर्म केवळ एक साधन आहे जो बदलता येऊ शकतो, फेकून दिला जाऊ शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचा हा व्यक्तिगत विचाराचा भाग असला तरी त्यांना अभिप्रेत असलेल्या लोकशाही प्रणालीनुसार जनतेचा धर्मस्वातंत्र्याचा अधिकार आणि समाजाची गरज म्हणून त्यांनी धर्म संकल्पनेकडे पाहिले. अल्पसंख्यांकांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्र संघामध्ये सुद्धा जाहीरनामा प्रकाशित केला आहे.

**संयुक्त राष्ट्र आणि अल्पसंख्याक हक्क दिवस**

संयुक्त राष्ट्र संघटनेने १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचा जाहीरनामा स्वीकृत करून प्रस्तृत केला आहे. त्यानुसार अल्पसंख्यांक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे तसेच याबाबतच्या वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी, यादृष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार प्रतिवर्षी दि. १८ डिसेंबर हा दिवस राज्यपातळीवर अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगामार्फत साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्राच्या अल्पसंख्यांक हक्काच्या जाहीरनाम्यानुसार भारतात सुद्धा केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्रालय स्थापन करण्यात आले आहे.

**केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्रालय**

२ जानेवारी २००६ रोजी अल्पसंख्यांक मंत्रालयाने मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारशी आणि जैन या अधिसूचित अल्पसंख्यांकांच्या प्रश्नांशी संबंधित अधिक

लक्ष केंद्रित करण्याच्या दृष्टीने सामाजिक न्याय व पर्यावरण मंत्रालयाची रचना केली. अल्पसंख्यांक समाजाच्या हितासाठी हे मंत्रालय संपूर्ण धोरण आणि नियोजन, समन्वय, मूल्यांकन आणि नियामक चौकट आणि विकास कार्यक्रमाचा आढावा तयार करते.

**भारतामध्ये अल्पसंख्यांक कोणाला म्हणायचे** एक वंश, एक भाषा, एक धर्म अगर सामाजिक वा सांस्कृतिक विषमता अशा कारणांनी एकरूप असलेले, एकत्र राहणारे, आपण स्वदेशीय व स्वराष्ट्रीय बहुसंख्य समाजापासून भिन्न आहोत, ही जाणीव ठेवणारे समूह म्हणजे अल्पसंख्यांक होत.

भारतीच संविधानातील तरतूदीनुसार भारतामध्ये पुढील दोन प्रकारचे अल्पसंख्यांक समुदाय आहेत

**१. धार्मिक अल्पसंख्यांक** राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग अधिनियम १९९२ (National Commission for Minorities Act, 1992) मधील कलम २(क) नुसार केंद्र शासनाने अधिसूचित केलेले, तसेच महाराष्ट्र राज्य शासनाने राज्य अल्पसंख्यांक आयोग अधिनियम २००४ मधील कलम २ (ड) नुसार खालील सहा समुदाय अल्पसंख्यांक लोकसमूह घोषित केले आहेत. ते सहा समुदाय म्हणजे मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौध्द, पारशी आणि जैन हे होत.

**२. भाषिक अल्पसंख्यांक** भारतातील राज्यामध्ये राज्यभाषेव्यतिरिक्त इतर भाषा मातृभाषा असलेल्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्यांक म्हणून गणण्यात येते. त्यामुळे भाषिक अल्पसंख्यांक समुदाय प्रत्येक राज्यात भिन्न असेल. महाराष्ट्रामध्ये मराठी व्यतिरिक्त अन्य भाषा मातृभाषा असणाऱ्या लोकसमूहाला भाषिक अल्पसंख्यांक गणण्यात येते.

अल्पसंख्यांक लोकसमुहाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या न्या. राजेंद्र सच्चर समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने दि. २१ फेब्रुवारी २००८ रोजी स्वतंत्र अल्पसंख्याक विकास विभागाची निर्मिती करण्यात आली.

## भारतातील अल्पसंख्यांकांचा सवैधानिक मान्यतेचा इतिहास

बहुतेक शब्दकोषामध्ये 'अल्पसंख्यांक' म्हणजे 'ज्यांची संख्या मोठ्या गटाच्या अध्यपिक्षा कमी आहे, अशी व्याख्या केली आहे. अल्पसंख्यांकांविषयीच्या आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय कायद्यांमध्येही एखाद्या राज्याच्या लोकसंख्येतील कमी संख्येचे लोकसमूह, अशाच अर्थाने ही संकल्पना जगभरात प्रस्थापित आहे.'[४] संयुक्त राष्ट्राने १९४७ मध्ये, आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या अंतर्गत 'भेदभाव प्रतिबंधक आणि

अल्पसंख्यांकांच्या संरक्षणावरील उप-आयोगाची स्थापना करण्यात आली. या उप-आयोगाने १९७७ मध्ये दिलेल्या विशेष अहवालात अल्पसंख्यांक समूह हा उर्वरित लोकसंख्येपेक्षा केवळ संख्येनेच कमी असतो असे नव्हे तर वंश, धर्म किंवा भाषेच्या आधारावर 'प्रभाव नसलेल्या स्थितीत' असतो, असे वर्णन केले आहे. १९९२ मध्ये, संयुक्त राष्ट्रांनी राष्ट्रीय किंवा वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांशी संबंधित असलेल्या व्यक्तींच्या हक्कांचा जाहीरनामा काढला, त्यात अल्पसंख्यांकांच्या अस्तित्व आणि अस्मितेचे रक्षण करण्यासाठी, त्यांना त्यांचे मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य वापरता यावे यासाठी योग्य कायदेविषयक आणि इतर उपायांचा अवलंब सर्व राष्ट्रांनी करावा, असे म्हटले आहे.[५]

'धार्मिक अल्पसंख्यांक' म्हणजे काय आणि कोण, याची लिखित व्याख्या कोणत्याही कायद्यात नाही. अनेक राज्यांमध्ये अल्पसंख्यांक आयोग कार्यरत असताना १९७८ मध्ये पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या सरकारने मुस्लीम, ख्रिश्चन आणि पारशी समुदायांसाठी 'केंद्रीय अल्पसंख्यांक आयोग' स्थापन केला. पुढे केंद्रीय अल्पसंख्यांक आयोगात शीख आणि बौद्धांचाही समावेश झाला. मग १९९२ मध्ये या आयोगाच्या अधिकारांचे आणि कार्यांचे नियमन करण्यासाठी 'राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग कायदा' अमलात आला, त्यामुळे कोणता समुदाय हा 'अल्पसंख्यांक' आहे हे ठरविण्याचे काम त्या कायद्यानेही सरकारवर सोडले. या संदर्भात करण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि पारशी यांचाच उल्लेख होता. मग जैनांनी त्यांचा समावेश नसल्याबद्दल निषेध केला, पुढे राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाने जैन समाजाच्या मागणीवर आपण अनुकूल असल्याची शिफारस सरकारला केली. शैक्षणिक क्षेत्रात गाजलेल्या 'टीएमए पै वि. कर्नाटक राज्य' (२००१) या खटल्यात, कोणत्या समाजाला अल्पसंख्य समजावे याचा निर्णय राज्य सरकार घेऊ शकते असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते (आणि कर्नाटकने जैनांना अल्पसंख्य दर्जा दिला नव्हता) म्हणून केंद्रीय अल्पसंख्यांक आयोगामध्येच जैन समाजालाही सामावण्याची मागणी 'बाळ पाटील व अन्य वि. भारत सरकार' या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेली. बाळ पाटील व अन्य वि. भारत सरकार या प्रकरणाचा २००५ चा निकाल सांगतो की, हा निर्णय सर्वस्वी केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहे. शेवटी २०१४ मध्ये मनमोहन सिंग सरकारने आपल्या कार्यकाळाच्या शेवटच्या टप्प्यामध्ये जैन समाजाला केंद्रातर्फे अल्पसंख्य दर्जा दिला. त्यानंतर २०१६ मध्ये महाराष्ट्र सरकारने अल्पसंख्य दर्जा दिला आहे.[६] अर्थातच भारतीय संविधानांमध्ये स्थानिक अल्पसंख्यांकांसाठी तरतुदी

आधीपासूनच आहेत.

भारतीय संविधानातील अल्पसंख्यांख्यांच्या संदर्भात तरतुदी[३]

**संविधानातील अनुच्छेद १४** नुसार भारतातील सर्व नागरिक कायद्यापुढे समान असतील आणि त्यांना समानतेने वागविण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

**संविधानातील अनुच्छेद १५** नुसार धर्म, जात, लिंग, वंश, भाषा, जन्मस्थान इत्यादीच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही, असे आधोरेखित केले आहे.

**संविधानातील अनुच्छेद १६** नुसार सर्व नागरिकांना राज्य सेवेत समान रोजगार संधी प्रदान करते. वंश, धर्म, जात, लिंग, जन्मस्थान, वंश किंवा निवासस्थानाच्या आधारावर सार्वजनिक नोकरी किंवा नियुक्तीच्या बाबतीत कोणत्याही नागरिकाशी भेदभाव केला जाणार नाही त्याचप्रमाणे रोजगार आणि विकासात सर्वांना समान संधी दिली आहे.

**संविधानातील अनुच्छेद २१ नुसार** भारतीय नागरिकांच्या जीवित आणि वित्ताचे रक्षण आणि स्वतःच्या इच्छेप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य (धर्म, जात, लिंग, वंश, भाषा, जन्मस्थान इत्यादीच्या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही) आहे. हे सर्व अधिकार भारतातील सर्व नागरिकांना दिले आहेत.

**संविधानातील अनुच्छेद २६** नुसार सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता, आरोग्य यास अधीन राहून धार्मिक आणि धर्मदाय हेतूने संस्थांची स्थापना करून ती स्वखर्चाने चालवण्याचा आणि धार्मिक गोष्टीत आपल्या व्यवहाराची व्यवस्था पाहण्याचा मालमत्ता संपादनाचा, संपत्ती बाळगण्याचा आणि त्याबाबतीत प्रशासन करण्याचा अधिकार आहे.

**संविधानातील अनुच्छेद २७** नुसार एखाद्या विशिष्ट धर्माच्या संवर्धनाकरिता कर देण्याची सक्ती, कोणत्याही व्यक्तीवर करता येणार नाही. या कलमांचा विचार केल्यास धार्मिक समुदायांना धार्मिक व्यवस्थापन करण्याचा आधिकार आहे. मात्र, अशा संस्था त्या त्या धर्मातील व्यक्तीवर कोणतीही सक्ती करू शकत नाहीत. व्यक्ती स्वतंत्र हा संविधानाचा महत्त्वाचा गाभा आहे. याचे स्मरण सर्वांनी बाळगले पाहिजे, अनेक वेळा जातपंचायत, खापपंचायत किंवा शरीयत अदालत यासारख्या समांतर संस्थांना भान नसल्याचे दिसून येत असते.

**संविधानातील अनुच्छेद २८** नुसार राज्याच्या निधीतून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शिक्षण संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. अशा संस्थेशी संलग्न असणाऱ्या जागेत धार्मिक उपासना चालविली जात असेल, तर त्या

व्यक्तीच्या इच्छेनुसार किंवा व्यक्ती अज्ञान असल्यास पालकांच्या सहमती शिवाय सहभाग घेतला जाऊ नये. अशा स्वरूपाची तरतूद करण्यात आलेली आहे.

संविधानातील अनुच्छेद २९ १ नुसार आपली स्वतःची भाषा, लिपी किंवा संस्कृती जतन करण्याचा अधिकार आहे. तसेच शासकीय अनुदान असणाऱ्या संस्थेत कोणत्याही नागरिकास त्यांचा धर्म, वंश, जात, भाषा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारता येणार नाही. संविधानात अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**संविधानातील अनुच्छेद ३० :** नुसार धर्म आणि भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार आहे. अशा संस्थांना आर्थिक सहाय्य करताना सरकारला भेदभाव करता येत नाही.

या शिवाय, संविधानातील कलम ३५० (क) नुसार अल्पसंख्याक नागरिकांच्या मुलांना, त्यांच्या मातृभाषेत शिक्षण घेण्याचा हक्क आहे. अल्पसंख्यांक समूहाच्या संरक्षणासाठी राज्यांनी, आपल्या राज्यात अशा शिक्षण संस्था स्थापन कराव्यात, अशी संविधानाने अपेक्षा व्यक्त केली आहे.

संविधानातील अनुच्छेद ३५० 'ख' नुसार अल्पसंख्यांक समाजाच्या बाबतीत राष्ट्रपतींना खास अधिकारी नेमण्याचा अधिकार दिला आहे. अल्पसंख्यांक समुदायाला स्वविकास आणि देशाच्या विकासात संधी देण्याबाबतीत संविधानकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात काळजी घेतली आहे.

शासनाने या दृष्टिकोनातून अल्पसंख्य समाजाचे कल्याण करावे, अशी संविधानकर्त्यांनी अपेक्षा केली आहे. याबाबतीत लोकशिक्षण पुरेशा प्रमाणात झाले नाही, ही वेगळी बाब आहे. अल्पसंख्यांकांचे प्रश्न ही काही भारतापुरतीच समस्या नाही, तर ती जागतिक समस्या आहे. जगातील प्रत्येक देशात अल्पसंख्य समाजाच्या हक्कांच्या संरक्षणाची काळजी घेतली पाहिजे, ही संयुक्त राष्ट्र संघटनेनी विविध राष्ट्रांकडून अपेक्षा केली. आपापल्या देशातील अल्पसंख्यांक समाजाच्या स्थितीचा आढावा घेऊन त्यात सुधारणा करण्यासाठी अल्पसंख्यांक दिवस साजरा करावा अशी अपेक्षा व्यक्त केली, त्यानुसार भारताने १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक दिन म्हणून साजरा करणार असल्याचे लेखी दिले.

भारतात अल्पसंख्यांक समाजाच्या संरक्षणासाठी विविध आयोग, समित्या आणि अभ्यासगटांची स्थापना करून समाजाचा आढावा घेतला जातो त्यानुसार असे दिसून येते की, प्रत्यक्षात या समाजाच्या पदरात काही पडत नाही. न्या. राजेंद्र सच्चर समिती, न्या. रंगनाथ मिश्रा आयोग, डॉ. महेमूद उर रेहमान अभ्यासगट

यांच्या अहवालातून त्यांच्या संदर्भात उदासीनता दिसून येते.[८] देशपातळीवर पंतप्रधानांचा अल्पसंख्यांकासाठी १५ कलमी कार्यक्रम आहे, पण प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही. अल्पसंख्याकांसाठी विविध महामंडळ कार्यरत आहेत. त्यांच्या योजना समाजापर्यंत पोहोचतात का? याबाबतीत अल्पसंख्यांक मंत्रालय मूल्यमापन करते का? या प्रश्नांचे प्रतिसाद तपासून पाहायला हवे. यावरून अल्पसंख्यांक समाजाच्या विकासाचा वास्तव समाजापुढे पुढे येईल.

**परीक्षण**

भारतात अल्पसंख्याक समाजाबद्दल बरेच काही बोलले जाते. त्यातून राजकारणही होते. समाजात गैरसमज वाढतात. प्रसंगी अल्पसंख्यांक-बहुसंख्यांक, असे ध्रुवीकरण होताना दिसते. हे सर्व भारतीय म्हणून अभिमान बाळगण्यासारखे नक्कीच नाही. आज प्रत्येक जण जात आणि धर्म, अल्पसंख्यांक-बहुसंख्यांक या चष्म्यातून आपापल्या अस्मिता जपत आहेत. भारतीयत्वाची भावना मागे पडत आहे. हिंदुत्ववाद्यांचा रेटा वाढत असताना अल्पसंख्यांकांमधील भीती आणि असुरक्षितता वाढत आहे. गोरक्षकांनी कायदा हातात घेऊन केलेले मॉबलिचिंग गेल्या काही (2014 to 2022) वर्षांत वाढले आहे. 'लव्ह जिहाद', 'केरोना जिहाद', 'आयएएस जिहाद,' अशा कपोलकल्पित संकल्पना माध्यम पटलावर पुन्हा पुन्हा येत राहतात. ही परिस्थिती संविधानाला अपेक्षित समाज निर्माण करताना अडसर ठरणारी आहे.

भारतीय नागरिक म्हणून अल्पसंख्यांक समाजाने आपल्या मूलभूत कर्तव्यांचा विसर पडू देऊ नये. कर्तव्यपालनाविना अधिकाराची भाषा अनैतिक असते. भारतीय संविधानाचे संरक्षण म्हणजे फक्त अल्पसंख्यांकांचे संरक्षण नाही, तसेच भारतीय संविधान म्हणजे फक्त अनुच्छेद २५ ते ३० नाही. याची जाणीव अल्पसंख्याक समुदायाने बाळगायला हवी. संविधान रूपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे अल्पसंख्यांक समाजाला दिले, ते अल्पसंख्यांक समुदायाच्या नेत्यांनी आपापल्या समाजाला दिले नाही, हे वास्तव आहे.

**संदर्भ :**


1. https://mdd.maharashtra.gov.in
2. https://maharashtratimes.com
3. www.loksatt.com ; November 17, 2022 ; मेहमूद ताहेर; हिंदूंना भारतात 'अल्पसंख्य' मानले जाऊ शकते का?
4. idb
5. idb
6. idb
७. विघे प्रशांत : मॉडर्न इंडियन पोलिटी; साईनाथ प्रकाशन नागपूर २०२०
८. तांबोळी डॉ. शमसुद्दीन : भारतीय संविधान आणि अल्पसंख्यांक समाज - https://www.mahamtb.com Date-16 December 2020.


◆ ◆ ◆

2022-23



# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिवीर प्रीतिलता वड्डेदार यांचे योगदान

प्रा. डॉ. जगदीश दयासागर हेंडवे
इतिहास विभागप्रमुख
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय
पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.

भारतात इ. स. १८८५ पासून नवीन युगाचा प्रारंभ झाला. हे युग ऐतिहासिक युग म्हणून ओळखले जाते. यावर्षी भारतीय राष्ट्रवादातून अखिल भारतीय राजकीय संघटना जन्मास आली ती म्हणजे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस होय. तेव्हापासून भारतीय जनमाणसात अधिक वेगाने राजकीय जागृती होवू लागली. राष्ट्रीय काँग्रेसचे प्रामुख्याने तीन कालखंड मानले जातात. ते म्हणजे इ. स. १८८५ ते इ. स. १९०५ आणि इ. स. १९०५ ते १९२० तर १९२० ते १९४७ असे आहेत. पहिल्या काळातील काँग्रेस ही मवाळ काँग्रेस म्हणून ओळखली जाते. तर १९०५ ते १९२० या काळातील काँग्रेस जहालवादी म्हणून प्रसिद्ध आहे. मवाळ काँग्रेस ही मध्यमवर्गीय बुद्धी–जीवींच्या हाती होती. या काळातील राष्ट्रीय काँग्रसचे ध्येय अस्पष्ट, अंधुक आणि संदिग्ध होते. जहालवादी काँग्रस अधिक गतिशील बनली असून तिचा उद्देश व कार्यक्षेत्र व्यापक होते. राजकीय दृष्टीने पूर्ण स्वराज्य हेच जहाल काँग्रसचे उद्दिष्ट होते. १९२० ते १९४७ या काळातील राष्ट्रीय काँग्रसचे नेतृत्व महात्मा गांधीजींकडे होते. या काळातील आंदोलनांत भारतीय जनमाणसांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असल्यामुळे संपूर्ण भारतीय लोकांत एक आशावादच नव्हे तर आत्मविश्वास निर्माण झाला. खऱ्या अर्थाने महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला अखिल भारतीय चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यत राष्ट्रीय काँग्रेसचे योगदान असामान्य आहे. मवाळांच्या आचारविचारातून जहालवादी विचारसरणीचा उदय झाला. तर जहालवादी विचारसरणीतून क्रांतिकारी दहशदवादी चळवळ जन्मास आली. याच काळात एका नवीन विचारसरणीचा उदय झाला. ती विचारसरणी म्हणजे क्रांतिकारी विचारसरणी होय. या क्रांतिकारकांना अपेक्षित परिणाम लवकर हवे होते. त्यांना मवाळ व जहालांचा आदर्शवाद व कार्यपध्दतीवर विश्वास नव्हता. भारताच्या विभिन्न भागातील क्रांतिकारकांच्या राजकीय तत्वज्ञानाचे निश्चित असे स्वरूप नव्हते. मात्र त्यांचा उद्देश एकच होता आणि तो म्हणजे भारताला परकीय गुलामगिरीतून मुक्त करणे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अनेक क्रांतिकारकांनी बलिदान दिले. सर्व देशभक्त व क्रांतिकारकांनी सुनियोजन, कुशलता, सामुहिक एकता, विचारशीलता, महान त्याग, आणि बलिदानामुळे आज भारतातील प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेतांना दिसतो आहे. या सर्व क्रांतिकारकांनी देशाला परकीय गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी महान संघर्ष केला. या क्रांतीकारकात भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, सुभाषचंद्र बोस यांच्या बरोबर स्त्री क्रांतिकारकांचे योगदान महत्वपूर्ण आहे. या स्त्री क्रांतीकारांमध्ये कल्पना दत्त, प्रीतिलता वड्डेदार यांनी देशासाठी आपले बलिदान दिले.

कुमारी प्रीतिलता वड्डेदार यांचा जन्म चितगाव येथील एका सामान्य गरीब कुटुंबात झाला. त्यांचे वडिल नगरपालिकेत सेवक पदावर कार्यरत होते. लहानपनापासून त्यांना क्रांतिकारी विचारांचे बाळकडू मिळाले होते. प्रीतिलता वड्डेदार यांच्यावर घरीच योग्य संस्कार झाले होते. त्या वयाच्या घऊ व्या वर्षी शाळेत दाखल झाल्या. प्रीतिलता वड्डेदार शाळेत शिकत असतांना एक व्यक्ती देशाच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ करीत आहे, याची त्यांना माहिती मिळाली. ती व्यक्ती होती सूर्यसेन. सूर्यसेन हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महान क्रांतिकारक होते. त्यांनी लाला लजपतराय, सुभाषचंद्र बोस

यासारख्या क्रांतिकारी सैनिकांसोबत काम करण्यास सुरुवात केली. तो पर्यंत ते अपरिचित होते. मा जेव्हा इंग्रज सरकारने इंग्रज विरोधी कारवायांसाठी सूर्यसेन यांना अटक केली. तेव्हा पासून प्रकाशझोतात आले. नंतर त्यांची सरकारने सुटका केली. याचवेळी प्रीतिलता वड्डेदार यांनी प्रथम त्यांना पहिले होते. प्रीतिलता वड्डेदार त्यांच्या कार्याने प्रभावित झाल्या. तेव्हा पासून त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याचा निर्णय घेतला.

याच काळात महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आंदोलन आकार घेऊ लागले होते. महात्मा गांधी राष्ट्रीय चळवळीत महिलांचा सहभाग वाढवा यासाठी प्रयत्न करीत होते. इंग्रज सत्तेच्या विरोधात राष्ट्रवादी महिलांचा एक गट स्थापन करण्याचा महात्मा गांधीजींचा उद्देश होता. गांधीजींच्या अहिंसक आंदोलनामुळे प्रभावित होवून अनेक स्त्रिया गांधीजींच्या चळवळीकडे आकर्षित झाल्या. असे असतांना सुद्धा अनेक भारतीय स्त्रिया क्रांतिकारी विचारांच्या होत्या. त्यांना अहिंसात्मक मार्गापेक्षा क्रांतिकारी मार्ग अधिक खुणावत होता. या क्रांतिकारी महिलांमध्ये कल्पना दत्त व प्रीतिलता वड्डेदार या क्रांतिकारी महिला आघाडीवर होत्या. त्यांच्या असामान्य अशा कार्यामुळे त्यांचे नाव भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. त्यांच्या बलिदानामुळे देश परकीय गुलामगिरीतून मुक्त झाला.

भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी शस्त्रांचा उपयोग करण्यासाठी तरुण तरुणींना प्रेरित केले. चितगांव कटात त्या सहभागी होत्या. चितगाव शस्त्रागार लुटण्यात प्रीतिलता वड्डेदार यांनी महत्वाची भूमिका बजावली होती. या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा प्राप्त केला. त्यामुळे क्रांतीकारकांनी इंग्रज हादरून सोडले होते. हा चितगांव कट यशस्वी झाला असता तर भारतातून इंग्रज लवकरच मायदेशी परत गेले असते, असे इतिहास तज्ञांचे मत होते. प्रीतिलता वड्डेदार यांच्या डोळ्यात केवळ केवळ राष्ट्रप्रेम होते. त्यांनी कशाचाही विचार न करता देश गुलामगिरीतून मुक्त करण्याकरिता क्रांतीचा मार्ग निवडला.. ही त्या काळातील स्त्रीच्या दृष्टीने महान गोष्ट होती. आज भारतीय तरुण मुलींनी या क्रांतिकारी स्त्रियांपासून प्रेरणा घेवून स्वरक्षण करण्यासोबतच समाजाचे, देशाचे रक्षण करण्यासाठी तत्पर राहायला पाहिजे.

प्रीतिलता वड्डेदार सर्वप्रथम सूर्यसेन यांना भेटल्या तेव्हा त्यांनी क्रांतिकारी चळवळीत सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा सूर्यसेन यांनी प्रीतिलता वड्डेदार यांना नकार दिला. मात्र त्यांच्या राष्ट्रप्रेमाने सूर्यसेन प्रभावित झाले. आणि प्रीतिलता वड्डेदार यांना आपल्या कार्यात सहभागी केले. पुढे अनेक कटाच्या नियोजनाचे काम त्यांनी प्रीतिलता वड्डेदार यांच्यावर सोपविले. प्रीतिलता वड्डेदार यांच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारकांनी अनेक वेळा इंग्रज अधिकाऱ्यांवर हल्ले करून त्यात यश संपादन केले.

चितगांव पहाडतली येथील ब्रिटीश क्लबमध्ये इंग्रज अधिकारी मनोरंजनासाठी जात असे. हा युरोपियन लोकांचा क्लब होता. या क्लबच्या बाहेर एक फलक लावला असून त्यावर असे लिहिले होते की, "कुत्रे आणि भारतीयांना प्रवेश नाही". इंग्रजांच्या या वागणुकीमुळे भारतीयांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण झाला. तेव्हा सूर्यसेन यांनी या क्लबवर हल्ला करण्याची योजना आखली. या योजनेत क्रांतीकारकांना अपेक्षित यश मिळाले नाही. तेव्हा २३ सप्टेंबर १९३२ रोजी रात्रीला दुसरी योजना आखली. या योजनेची सर्व जबाबदारी सूर्यसेन यांनी प्रीतिलता वड्डेदार यांच्याकडे सोपविली. प्रीतिलता वड्डेदार यांच्यासह एकूण १० क्रांतिकारक या योजनेत सहभागी होते. या सर्वांना शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

प्रीतिलता वड्डेदार यांनी क्लबवरील हल्ल्याचे योग्य नियोजन केले. त्यांनी आपल्या क्रांतिकारकांचे तीन भागात विभाजन केले. प्रीतिलता वड्डेदार यांच्या नेतृत्वाखाली क्लबवर हल्ला केला. यावेळी क्लब मध्ये जवळपास ४० इंग्रज लोक होते. या हल्ल्यात एक इंग्रज महिला ठार झाली. आणि अनेक इंग्रज अधिकारी जखमी झाले. यावेळी प्रीतिलता वड्डेदार या जखमी झाल्या.


तर अनेक क्रांतिकारक धारातीर्थी पडले. मात्र प्रीतिलता वड्डेदार शेवटपर्यंत इंग्रजांच्या हाती लागल्या नाहीत. शेवटी त्यांनी विष प्राशन करून देशासाठी बलिदान दिले. प्रीतिलता वड्डेदार या विरकन्येचे बलिदान देशासाठी प्रेरणादायी आहेत. आजही बांगलादेश व भारतात या दोन्ही देशात त्यांच्या योगदानाला मानवंदना दिली जाते. त्यांच्या कार्यापासून देशवासियांना प्रेरणा मिळावी म्हणून त्यांचे नाव रस्त्यांना दिले आहे. एवढेच नव्हेतर अनेक शाळा महाविद्यालयांना त्यांचे नाव दिले आहे. कारण त्यांचे देशासाठीचे योगदान कायम स्वरुपात जिवंत राहावेत आणि त्यांच्यापासून तरुण पिढीने प्रेरणा घावी, हाच उद्देश आहे.

## निष्कर्ष

इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारतभूमिला मुक्त करण्यासाठी प्रीतिलता वड्डेदार या विरकन्येने बलिदान दिले. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात प्रीतिलता वड्डेदार यांचे योगदान आजच्या स्त्रियांना प्रेरणादायी आहेत. आज देश स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. मात्र आजही देशाची स्थिती व अवस्था पाहिल्यास मोठ्या प्रमाणात स्त्रियांवरील अत्याचारात वाढ झाली आहे. तेव्हा भारतीय स्त्रियांनी व तरुणींनी प्रीतिलता वड्डेदार यांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून स्वरक्षण करण्यासोबतच देश कार्यात योगदान देणे काळाची गरज आहे. प्रीतिलता वड्डेदार ही इंग्रजांशी लढल्या. मात्र आज आपलेच रक्षक स्त्रियांचे भक्षक बनले आहे. त्यासाठी प्रीतिलता वड्डेदार यांच्या कार्याची प्रेरणा स्त्रियांच्या अत्याचाराला वाचा फोडू शकते, यात कोणतीही शंका नाही. आजच्या भारतीय तरुणांनी प्रीतिलता वड्डेदार हिला आपला आदर्श मानले पाहिजे.

## संदर्भ ग्रंथसूची

१. बी. एल. ग्रोवर आणि एन. के. बेल्हेकर आधुनिक भारताचा इतिहास एस. चंद आणि कं. लि. नवीन दिल्ली.
२. डॉ. नि. आ. वक्काणी आधुनिक भारताचा इतिहास श्री. मंगेश प्रकाशन नागपूर.
३. विपिन चंद्र आधुनिक भारत का इतिहास ओरिएंट ब्लैकस्वॉन, नई दिल्ली.
४. आचार्य शं. द. जावडेकर आधुनिक भारत कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
इतिहास परिषद ५५ वे अधिवेशन
निवडक शोधनिबंध
(खंड - बाविसावा)
2022-2023
संपादक : डॉ. गोविंद तिरमनवार
५४ वे अधिवेशन, श्री शिवाजी महाविद्यालय
राजुरा जि. चंद्रपूर
SAI JYOTI PUBLICATION
Om Sai Publishers & Distributors
Available Also on
amazon

# 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेचे वेगळेपण'

**डॉ. जगदीश दयासागर हेंडवे**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय
पारवा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.

**सारांश**

प्राचीन काळापासून १८, १९ व्या शतकापर्यंत भारतात अनेक राज्य व राजवंश अस्तित्वात होते. अनेक राजवंशांनी व राजांनी आपल्या कर्तुत्वाचा ठसा इतिहासात उमटविला आहे. याकाळातील सम्राट चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक, चंद्रगुप्त द्वितीय विक्रमादित्य, सम्राट हर्षवर्धन, मोगल बादशहा अकबर इत्यादी राजांचा प्रामुख्याने समावेश होतो. ज्या काळात शिवाजी जन्मास आले तो काळ परकीय सत्तेचा काळ होता. शिवाजीचे वडील शहाजी भोसले यांनी दक्षिणेतील विविध राज्यात नोकरी केली होती. शिवाजीची आई राजमाता जिजाबाईंनी बालवयात शिवाजीवर योग्य सुसंस्कार केले. बालवयापासूनच शिवाजी स्वतंत्र विचारसरणीचे पुरस्कर्ते होते. वास्तविक पाहता शिवाजी महाराजांचा काळ सरंजामशाहीचा काळ होता. शिवाजी सुद्धा त्यापैकीच एक होते. तत्कालीन काळातील अभिजन लोक त्यांना बरोबरीचा मानायला तयार नव्हते. मात्र शिवाजी महाराजांनी आपल्या बुद्धिमत्तेने, दूरदृष्टीने आणि कर्तुत्वाने संपूर्ण विश्वाचे लक्ष वेधले होते.शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले. केवळ स्वराज्यच निर्माण केले नसून ते राज्य सर्वदृष्टीने जनतेचे राज्य बनविले होते. शिवाजींच्या साम्राज्यातील जनता शिवाजींच्या राज्याला स्वतःचे म्हणजे रयतेचे राज्य समजत असे. वास्तविक पाहता शिवाजींनी जे राज्य निर्माण केले होते ते राज्य जनतेचे असून, जनता प्रत्येक कार्यात शिवाजींच्या सोबत होती. राज्यातील प्रत्येक माणूस आपले राज्य मानून शिवाजींसाठी जीव [illegible] असे म्हणतात की, 'साम्राज्यवादी विरुद्ध बंड उभारून स्वराज्याची पहिली मुहूर्तमेढ छत्रपती शिवाजी महाराजांनी रोवली'. तर जगप्रसिद्ध इतिहासकार [illegible] म्हणतात की, छत्रपती शिवाजी महाराजांसारखे राजे आमच्या देशात जन्माला आले असते तर त्यांच्या स्मृतीचा अक्षय ठेवा आमच्या डोक्यावर घेवून आम्ही आनंदाने नाचलो असतो.

**प्रस्तावना**

छत्रपती शिवाजी महाराजांना वंशपरंपरागत राजसत्ता मिळाली नव्हती. आपल्या पित्याचा [illegible] पाहणे फार सोपे असते. जगात वारसा हक्काने बनलेले अनेक राजे होऊन गेले. मात्र शिवाजी वारसा हक्काने बनलेला राजा नव्हता. शिवाजींनी स्वतःचे राज्य निर्माण केले. शिवाजी राज्यसंस्थापक होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिवाजींनी भारतभूमीत स्वकर्तुत्वाने राज्य निर्माण केले. वास्तविक पाहता याचाने वडील शहाजी राजे माता जिजाबाई यांची प्रेरणा होती.तसेच महाराष्ट्राच्या मातीत ज्या संतांनी आपल्या विचारांनी महाराष्ट्रातील जनतेत समानतेची भावना जागृत केली. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील जनतेत नवचैतन्य, नवविचार व डोळसवृत्ती दिली. या सर्व संतांच्या विचारांनी शिवाजी महाराज प्रभावित झाले होते कारण शिवाजींनी संत तुकाराम महाराजांना गुरु मानले होते.

मध्ययुगीन काळात दक्षिणेत शिवाजींनी स्वतःचे राज्य निर्माण केले होते. याच काळात भारतात उत्तरेत कर्तबगार राजपूत राजे अस्तित्वात होते. मात्र ते सर्व राजे मोगलांच्या सेवेत होते. त्यांनी इमाने इतबारे मोगल साम्राज्याची सेवा केली. जर त्यांनी संघटीत होवून मोगलांचे आधिपत्य झुगारून दिले असते तर भारतातून मोगलांना परत आपल्या मायदेशी जावे लागले असते. मात्र तशी कल्पनाही त्यांच्या सुचली नसावी यात शंका आहे. मात्र शिवाजींनी राज्यस्थापनेची मनिषा बाळगली होती. शिवाजी जवळ कोणतीच साधन सामग्री नसून अनेक समस्या आवासून उभ्या होत्या. तरीही

त्यांनी केवळ विचारच केला नाही तर [illegible] स्वतंत्र मराठ्यांचे राज्य स्थापन केले. हेच शिवाजी महाराजांचे वेगळेपण होय.

शिवाजी महाराजांनी केवळ राज्यच निर्माण केले नाही तर साम्राज्याचा विस्तार व विकास कसा करता येईल याचे सुद्धा योग्य नियोजन केले होते. राज्यातील प्रजेला, सामान्य जनतेला, बहुजन समाजाला आपले राज्य वाटावे असेच राज्य शिवाजीने निर्माण केले होते. हेच शिवाजी महाराजांचे वेगळेपण होते. म्हणजेच शिवाजीचे राज्य हे जनतेचे राज्य होते. म्हणूनच जगातील अनेक विद्वान शिवाजी राजांना रयतेचा राजा म्हणून संबोधतात. शिवाजी राज्यांनी सुराज्य निर्माण करून प्रशासनात सर्व जाती धर्माच्या लोकांना वरिष्ठ पदावर नियुक्त केले होते. शिवाजीच्या आरमाराचे प्रमुख दौलतखान, शिवाजीचा खास नोकर मदारी मेहतर, शिवाजी महाराजांचा वकील काझी हैदर, शिवाजीच्या तोफखाना विभाग प्रमुख इब्राहीम खान, किल्लेदार महार अशी अठरा पगड जातीतील मंडळी शिवाजीच्या प्रशासन विभागाची आधारस्तंभ होती. शिवाजी महाराजांच्या राज्यातील जनतेला, स्त्रियांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची संपूर्ण काळजी शिवाजींनी घेतली होती. अशा प्रकारच्या आज्ञा अथवा आदेश त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना व अष्टप्रधान मंडळाला दिले होते यातच शिवाजीचे वेगळेपण दिसून येते.

मात्र आज भारतात १९५० पासून लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आहे. जगातील अनेक देशात आपल्या देशासारखी लोकशाही व्यवस्था आहे. परंतु लोकशाही राष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला ही राज्य आपली वाटते का? असा प्रश्न पडतो. भारतात मागील सहा, सात वर्षाच्या काळात लोकशाही व्यवस्था पायदळी तुडविली जात आहे, असे प्रकर्षाने जाणवते. आपल्या देशातील लोकशाही हुकुमशाहीकडे झुकू लागली आहे. सध्याचे जनतेचे पुढारी, राजकीय नेते स्वतःला हुकुमशहा समजत आहेत. देशात सर्वच क्षेत्रात कमालीची विषमता वाढली आहे. त्यामुळेच आज आपल्या देशाला शिवाजी महाराजांच्या विचारांची, त्यांनी राबविलेल्या लोककल्याणकारी धोरणाची, कर्तुत्ववान राजाची गरज आहे. आज भारतातील नेते, पुढारी, राज्यकर्ते केवळ शिवाजी

[illegible] कृती विकसित करताना दिसून येते.

शिवाजींनी तत्कालीन काळात परकीयांशी आणि स्वकियांशी जो लढा दिला तो लढा स्वार्थासाठी नसून तो परिवर्तनासाठी होता. सर्व मानवी अधिकार नाकारलेल्या जनतेला सन्मानाने जगता यावे यासाठीच स्वराज्याची शिवाजींनी स्थापना केली होती. त्यानुसारच रयतेच्या मानसिकतेत बदल करून शिवाजींनी राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील गुलामगिरी नष्ट केली. समाजात समता, बंधुत्व, न्याय प्रस्थापित केला. शिवाजींनी वडील शहाजी, राजमाता जिजाबाई व गुरु संत तुकाराम महाराज यांचे विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविले होते. शहाजी राजांनी शिवाजीला त्याच्या १२ व्या वर्षी शिवराजमुद्रा दिली होती. शिवराजमुद्रे वरून 'विश्ववंदिता' असा स्पष्ट उल्लेख मिळते. अर्थातच शिवाजींनी विश्वबंधुता, विश्वशांती, विश्वभरभराट, विश्वविकास अशी उदात्त भावना ठेवूनच स्वराज्याची उभारणी केली होती. हेच शिवाजींचे वेगळेपण होते.

वयाच्या केवळ पंध्रा व्या वर्षी तुकाराम महाराज यांनी शिवबास छत्रपती अशी पदवी दिली होती. संत तुकाराम महाराजांच्या कीर्तनातून महाराष्ट्रातील गावागावातील मावळे पेटून उठले होते. हेच सर्व मावळे वारकऱ्यांचे धारकरी बनून शिवाजी महाराजांच्या सैन्यात दाखल झाले होते. या मावळ्यांच्या दृढ शक्तीवर शिवाजींचे म्हणजेच जनतेचे राज्य उभे होते. शिवाजीच्या जीवाला जीव देणारे मावळे मराठी साम्राज्याचे आधारस्तंभ होते. शिवाजीच्या राज्याची संपूर्ण शक्ती ही जनता होती. हेच शिवाजींचे वेगळेपण होय. आज आपल्या देशात लोकशाही व्यवस्था असून संपूर्ण प्रशासनाला भ्रष्टाचाराने कवटाळले आहे. राज्यकर्तेच भ्रष्टाचारी असेल अधिकारी कसे सुधारतील? म्हणूनच आज आपल्या देशाला शिवाजी सारख्या राजाची खरी गरज आहे.

शिवाजीच्या जीवाला जीव देणारे कट्टर व एकनिष्ठ मावळे शिवाजीने निर्माण केले होते. असे न मानता हे सर्व मावळे शिवाजीच्या कार्यासमोर नतमस्तक झाले होते. त्यामुळेच ते सुराज्याचे खरे आधारस्तंभ होते. प्राण गेला तरी बेहत्तर राजाच्या आज्ञा मोडायच्या नाही, आणि शत्रूला कधी पाठ दाखवणार नाही अशी प्रत्येक मावळ्यांनी जणू शपथच घेतली होती. तो शिवा न्हावी

म्हणूनच आज देशाला वास्तविक शिवाजीची गरज आहे. शिवाजी महाराजांची आठवण यासाठीच होते.

**संदर्भ ग्रंथसुची**


१. कॉ. गोविंद पानसरे, शिवाजी कोण होता? लोकवाङ्मय गृह, मुंबई.
२. प्रा. आर.ए. पाटील मराठ्यांचा इतिहास (इ.स. १६३ ते १८१८) के. सागर पब्लिकेशन, पुणे.
३. पुरुषोत्तम खेडेकर, शिवचरित्र जिजाई प्रकाशन, पुणे.
४. श्रीमंत कोकाटे, शिवाजी राजांचे खरे शत्रू कोण? संस्कृती प्रकाशन व ग्रंथदालन, पुणे.
५. डॉ. हेमंतराजे गायकवाड, द ग्रेटेस्ट शिवाजी महाराज स्नेहल प्रकाशन, पुणे.

2022-23

प्रिय मित्र
डॉ. गजानन लोहवे
सरांना....
18/10/2?

# भटक्यांची भ्रमणगाथा मांडणारा कादंबरीकार

# अशोक पवार

-: संपादक :-

डॉ. अनंता सूर

Prashant

प्रशांत पब्लिकेशन्स

Prashant

Email : prashantpublication.jal@gmail.com
Website : www.prashantpublications.com

File No. ________

2022-23

प्रा. डॉ. गजानन रा. लोहवे

# एकविसाव्या शतकातील ग्रामीण कविता

# कुळवाडी अभंग

संपादक

## डॉ. रंगनाथ नवघडे

६१९

ISBN No. : 978-93-92304-15-6

**एकविसाव्या शतकातील ग्रामीण कविता : कुळवाडी अभंग**

संपादक
डॉ. रंगनाथ नवघडे
देगाव (बु.), ता. अर्धापूर,
जि. नांदेड
भ्र. ९७६३८२२३९४

प्रकाशक
**दत्ता डांगे**
इसाप प्रकाशन,
'कांचनब्रह्म'
१९०, सहयोगनगर, नांदेड
भ्र. ९८९००९९५४१

मुद्रक
**आर्टी ऑफसेट प्रिंटर्स**
लातूर

प्रथमावृत्ती
२६ जून २०२२
(राजर्षी शाहू महाराज जयंती)

सर्व हक्क
**डॉ. रंगनाथ नवघडे**

मुखपृष्ठ
**संतोष घोंगडे**

मांडणी
**विजयकुमार चित्तरवाड**

अक्षरजुळणी
**सुदर्शन अग्रवाल**

**मूल्य : २००/-**

**EKVISAVYA SHATAKATIL GRAMIN KAVITA : KULWADI ABHANG**

Editor
Dr. Rangnath Navghade
Degaon (Bk.), Tq. Ardhapur,
Dist. Nanded
Cell : 9763822394

Publisher
Datta Dange
Esap Prakashan
190, Sahayog Nagar
Nanded - 431 605
Cell : 9890099541
e-mail:esap.prakashan@gmail.com
website : www.esapprakashan.com

Printers
Arty Offset Printers
Latur

First Edition
26 June 2022
(Birth Anniversary of Rajarshi Shahu Mahar

©
Dr. Rangnath Navghade

Cover Design
Santosh Ghongade

Layout
Vijaykumar Chitarwad

Typography
Sudarshan Agrawal

**Price : 200/-**

या ग्रंथातून व्यक्त झालेली मते ही त्या-त्या लेखकांची असून संपादक व प्रकाशक या मताशी सहमत असतीलच असे नाही.

कष्टकऱ्यांच्या श्रमाचा सन्मान करून
त्यांच्या हितासाठी प्रेरणादायी विचार देणारे
कुळवाडीभूषण छत्रपती शिवराय
व
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या विचार, कार्याला...

निर्मितीसाठी स्त्री-पुरुष समानता या मूल्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. म्हणून कवी म्हणतात -

'स्त्री-पुरुष समान। मानावे गावाने। स्त्रीला अभिमान। वाढवावे।।
मुलीला शिक्षण। द्यावे अगत्याने। शिक्षण शहाणे। करी तिला।।
आज घरोघरी। सावित्री बनवा।। शिक्षणाचा ठेवा। अनमोल।।'
(पृष्ठ ६९)

शिकलेली स्त्री ही कुटुंबाला पुढे घेऊन जात असते. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षणापर्यंत शिकण्याची संधी दिली पाहिजे, ही कवीची अपेक्षा या अभंगवाणीतून आविष्कृत झालेली आहे.

एकंदरीत कवी माधव जाधव यांचा 'कुळवाडी अभंग' रचनेला समाजशास्त्रीय, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक परिमाण लाभले आहे. शेतकरी जीवनाला तात्त्विक व मूल्यांचे अधिष्ठान देऊन त्यांच्या जगण्याला बळ दिले आहे. 'कुळवाडी अभंग' रचनेतील शैक्षणिक विचार अधोरेखित करतांना ही जाणीव होते की, ग्राम स्वराज्य निर्माण करण्यासाठी शेतकरी आत्मनिर्भर झाला पाहिजे. यासाठी महापुरुषांचे विचार शेतकरी मनोभूमिकेत रुजले पाहिजे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात ग्रामीण आणि शहरी विकासाची दरी कमी झाली पाहिजे. गावात कृषिवाचनालय सुरू केले पाहिजे. शिक्षणातून गावात समृद्ध वातावरण निर्माण झाले पाहिजे. शैक्षणिक सहल शेती पाहण्यासाठी काढली पाहिजे. गावपारावर शेती विकासाच्या गप्पा झाल्या पाहिजेत. मुलींनाही शेतीचे शिक्षण दिले पाहिजे. शेती क्षेत्रात संशोधन झाले पाहिजे. याद्वारे शेतकऱ्यांनी आपले कौशल्य शेती विकासाला लावले पाहिजे. शेतकऱ्यांनी तंत्रज्ञानाचा अवलंब केला पाहिजे. स्त्री-पुरुष यांच्यात समता प्रस्थापित झाली पाहिजे. शेवटी थोडक्यात सांगायचे म्हणजे 'कुळवाडी अभंग' रचना ही गावगाड्याचा सर्वांगीण विकासाचा मूलमंत्र होय.

कुळवाडी अभंगातील शैक्षणिक विचार हा ग्रामविकास आणि ग्रामसमृद्धीचा आधार आहे. तो गावागावात उत्तमरित्या रुजवायचा असेल तर, या अभंगाचे गावागावात, गावातील पारावर, शाळेत प्रकट वाचन झाले पाहिजे. हे अभंग ग्रामीण माणसाच्या मनात रुजले पाहिजेत. ते रुजतील हाच आशावाद आहे.

**डॉ. रंगनाथ नवघडे**
नांदेड, भ्र. ९७६३८२२३९४

माधव जाधवांनी 'कुळवाडी अभंग' लिहिले. हा छोटासाच, पण शेतकऱ्यांच्या समस्यांचे 'कूळ' शोधणारा व त्यावर योग्य उपाय सांगणारा; शेतकऱ्यांना काही प्रमाणात 'प्रमाण ग्रंथ' ठरावा एवढा महत्त्वाचा कवितासंग्रह आहे. शेतकऱ्यांच्या दुःखांवर फुंकर घालणाऱ्या बेगडी मायांना पेव फुटलेल्या या काळात शेतकऱ्यांच्या दुःस्थितीची कारणे सांगून, धर्माच्या अवडंबरात व प्रथा परंपरेच्या अंधानुकरणात रुतलेल्या शेतकऱ्यांवर प्रहार करीत, त्यांच्या डोळ्यात अंजन घालीत, ज्ञान-विज्ञान, विकासाच्या योजना, बचत गटापासून ते सामुदायिक शेतीपर्यंतचे ज्ञान देत, त्यांच्या भविष्याचा मार्ग प्रशस्त करणारी जाणीव 'कुळवाडी अभंगा'तून व्यक्त झाली आहे. ही सामाजिक जाणीव मला फार मोलाची वाटते.

'कुळवाडी अभंगाच्या' सुरुवातीलाच माधव जाधव एक प्रश्न विचारतात, तो असा की, शेती हा व्यवसाय आहे का? आणि तो व्यवसाय असेल तर नफ्याचा आहे का? याच्या उत्तरातच शेतकऱ्याचा विकास दडलेला आहे. मात्र, हा प्रश्न अनुत्तरित आहे. शेतकऱ्याने शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहिल्यास व्यवसायाचे सारे गुण, कौशल्ये आणि ज्ञान त्याला आत्मसात करावे लागेल. त्यासोबतच सरकार शेतीकडे इतर व्यवसायांप्रमाणे व्यवसाय म्हणून पाहते का? याला उत्तर होकारार्थी असेल तर सबंध मानवांना जगविणारा शेती हा मूळ व्यवसाय म्हणून तेवढ्या निकडीने व आदराने शेती आणि शेतकऱ्यांकडे पाहिल्या जाते का? कारण, कोणत्याही व्यवसायाविषयीची सर्वप्रथम निष्ठा आणि स्वाभिमान असल्याशिवाय त्या व्यवसायाला प्रगतीचे पंख फुटत नाहीत. आज शेतकऱ्यांनाही या व्यवसायाबद्दल आदर नाही आणि शेतकऱ्यांच्या (बळीराजा) आत्महत्येची सरकारला कदर नाही. शेतीची महत्ता आणि आवश्यकता सारेच प्रस्थापित, विस्थापित मान्य करतात. मात्र, 'गरिबी हटाव'च्या घोषणेतून गरिबी कायम राहावी व गरीब तेवढा हटावा असा शेतीतून शेतकरी दुर्लक्षित, उपेक्षित झाला आहे. असे का झाले? बळीराजा असा भूकबळी का ठरावा? याचे चिंतन व उपाययोजन 'कुळवाडी अभंगाचे' आशयसूत्र आहे. माधव जाधवांची ही चिंतनशीलता शेतकऱ्यांच्या प्रश्नाला उत्तर ठरावी, असा विश्वास वाटतो.

भारतातील बहुसंख्य जनता आज शेतीच करते आहे; मात्र जगण्याचे परंपरागत साधन म्हणून, भारतीय शेती ही आजही मोठ्या प्रमाणात श्रद्धेने केली जाते. आईची माया म्हणूनच तिचा आजही विचार होतो. शेतकरी हा

शेती परंपरेने करीत असल्यामुळे येथे शिक्षणाची आवश्यकता नाही, हा त्याचा विश्वास शिक्षण नसल्याने आधुनिकता तर नाहीच शिवाय प्रथा, परंपरेचे अंधानुकरण यामुळे अंधश्रद्धा वाढल्या, विवेक हरवून खर्च वाढला, परिणामी कर्जाच्या डोंगराखाली दारिद्र्यात मानसिकता बिघडली. व्यसनांच्या आहारी गेल्याने कौटुंबिक ताण-तणाव निर्माण झाला. मुलांच्या बेरोजगारीसोबतच मुलींच्या हुंड्याचा प्रश्न 'आ' वासून उभा राहिला. बी-बियाणांच्या भाववाढीसमोर सरकारचा हमीभाव कमकुवत ठरला आणि कवडीमोल भावात माल विकल्यावर व्यापाऱ्यांना श्रीमंत करणारी भाववाढीची निसर्गासारखी लहरी व माणसांसारखी स्वार्थी धोरणे शेतकऱ्यांच्या आत्महत्येला पोषक नि पूरक ठरली. जखम वेगळी आणि उपचार निराळेच! अशा सरकारच्या योजना. यामुळे श्रम करण्याची निष्ठा व स्वाभिमान निर्माण होण्याऐवजी कमजोर बनविणाऱ्या योजना व आयते खाण्याची मानसिकता, यामुळे शेतकरी खंगत जातो. पर्यायाने आत्महत्येचा विचार सुरू होतो. अशा अनेक कारणांनी शेतकऱ्यांची मानसिकता खचलेल्या पार्श्वभूमीवर 'तुज आहे तुजपाशी' ही जाणीव करून जगण्याची नवी उमेद निर्माण करण्याचा प्रयत्न 'कुळवाडी अभंग' करते.

'कुळवाडी अभंग' हे शेतकऱ्याच्या अस्वस्थ, भेसूर व कंगाल जीवनाचे चित्रण करते. उत्पन्न आणि खर्चाचा मेळ न बसविता येणाऱ्या त्यांच्या अव्यवसायिकतेचेही वर्णन करते. शेतकरी भूमीला आई म्हणतो मात्र, तिची देखभाल करण्याऐवजी कर्ज काढून दरवर्षी वारी करतो.

'कित्येक वर्षाची! चालू आहे वारी।। शेती ती बिचारी। आजारीच।।'२

हा विरोधाभासही जाधव व्यक्त करतात. 'कुळवाडी अभंग' हे पुरातन काळातील कृषिसंस्कृतीच्या बळी वैभवापासून तर कृषिचिंतक महापुरुषांच्या विचारापर्यंतचा प्रवास मांडते. शेतकऱ्यांच्या श्रद्धेपासून तर ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विकासापर्यंतचा आलेख चितारते. कुळवाडी अभंगाचे वैशिष्ट्य असे की, ते केवळ शोषणांप्रमाणे कल्पनांची खैरात वाटत नाही, तर शेतकऱ्यांना कृतिशील बनविते. आत्मचिंतन आणि आत्माभिमान शिकविते. स्वतःचा उद्धार स्वतःच केला पाहिजे, हे आत्मनिर्धाराचे तत्त्व रुजवते.

'कुळवाडी अभंगात' ग्रामीण जीवनाचे, शेती आणि शेतकरी यांच्या स्थितिगतीचे सूक्ष्मातिसूक्ष्म चिंतनशील भाष्य कवीने केले आहे. खरेतर 'अभंग' हा प्रकार मध्ययुगीन काळातील ईश्वरभक्तीचे प्रभावी माध्यम होते. मात्र,

विज्ञानकाळातही हा प्रकार आपल्या विचारांच्या आविष्कारणासाठी प्रभावी ठरू लागला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, 'कुळवाडी अभंग.' बळीचे राज्य हे शेतकऱ्यांच्या सुखाची हमी देणारे होते. म्हणूनच, आजही 'इडा पिडा टळो नि बळीचे राज्य येवो' अशी आर्त याचना आपली माय-माउली करते आहे. माधव जाधव याहीपुढे जाऊन कृषिचिंतकांची परंपरा सांगतात. महापुरुषांनी सांगितलेले कृषिविचार हे आजच्या काळात शेतकऱ्याला कसे तारणारे आहेत. हे पटवून देतात. शेतकरी हा शेतीत रात्रंदिवस राबराब राबतो, ढोरकष्ट उपसतो. एवढे कष्ट करूनही त्याचा विकास तो कोणता झाला? म्हणून केवळ शेतकऱ्याने ढोरमेहनत करू नये, तर 'तिचे बारकावे। ओळखावे।।' म्हणजेच, आधुनिक काळात गुंतागुंतीची जीवनशैली, उत्पनांची विविधता, बी-बियाणांचे वेगळेपण आणि माहिती-तंत्रज्ञानाचा विकास याचा फायदा शेतकऱ्याने घ्यावा. मनातून निर्माण झालेल्या श्रद्धा व अंधश्रद्धेने शेती करण्यापेक्षा, विज्ञानाच्या साह्याने, विवेकाने शेती करावी. तरच शेतकरी फायद्यात राहील. अथवा जागतिकीकरणाच्या यंत्रयुगात पारंपरिक शेती आणि शेतकऱ्याचा 'बोऱ्या' वाजल्याशिवाय राहणार नाही. हा धोक्याचा इशारा जाधव यांनी दिला आहे. या अभंगातून जाधवांनी शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला कारणीभूत ठरणाऱ्या परंपरागत पद्धतीची, त्याच्या मागासलेपणाची कारणे सांगितली आहेत. याचा विचार शेतकऱ्यांनी केला पाहिजे.

"गावोगावी करा। कृषिवाचनालय। अन् विद्यालय। शेतीचे ते।।"

माधव जाधवांनी चित्रित केलेली 'कृषिवाचनालय' ही संकल्पना अत्यंत नवीन तर आहेच; शिवाय, शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे "विद्ये विना मती... इतके अनर्थ एका अविद्येने केले" या महात्मा फुल्यांच्या कारणमीमांसेला पुढे नेणारी आहे. मात्र, बहुतांश शेतकऱ्यांची शोकांतिका अशी की, शेती करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता नाही, असे त्याला वाटते आणि शिकलेली माणसे शेती करत नाहीत. पर्यायाने शेती हा न शिकलेल्या किंवा अप्रशिक्षित लोकांचा नाइलाजाने करावयाचा व्यवसाय होतो. मात्र, अलीकडे हे पूर्वापार चालत आलेले चित्र पालटते आहे. 'ॲग्रोवन'सारखे दैनिक तो वाचतो आहे. शेतकऱ्यांच्या शेती निरीक्षण सहली/ अभ्यासदौरे वाढत आहेत. 'व्हॉट्सॲप' वर शेतकरी ग्रुप करून विचारांची देवाणघेवाण करीत आहेत. अशाप्रकारे शेतीला आधुनिकतेची व ज्ञानाची चाहूल लागली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्याला शेतीपूरक ज्ञान मिळण्यासाठी 'कृषिवाचनालये' ही संकल्पना

शेतकऱ्यांना विकासोन्मुख करणारी वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळात शेतीच्या उत्पादनात क्रांती झाली. उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले. ही वस्तुस्थिती सांगून शेतकरी सुखी झाला, अशी बोळवण केली जाते. शेतीचे उत्पादन वाढले; मात्र, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले नाही. एकरी उत्पादन वाढले. त्यासोबतच त्याचा खर्चही प्रचंड वाढला. परिणामी, शेतकरी गरीब तो गरीबच राहिला. गरिबी हटावच्या योजनेत गरीब हरला. गरिबी तशीच राहिली. हे दुःख स्वातंत्र्याच्या ६५ वर्षांनंतरही लोकशाहीला प्रश्न विचारते आहे. कवी या प्रश्नाला पर्याय देण्याचा प्रयत्न करतो.

स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांच्या विकासाच्या अनेक योजना आखण्यात आल्या. त्याने शेतकऱ्यांचा विकास होईल, हा आशावाद मात्र फोल ठरला. कारण गरजवंत शेतकऱ्यांपर्यंत बऱ्याच योजना पोहोचल्याच नाहीत. याची काही कारणे सरकारी यंत्रणेच्या स्वार्थी, भ्रष्टाचारी नि वांझ व्यवस्थेत तर, काही शेतकऱ्यांच्या उदासीनतेमध्ये आहेत. योजनांनीच आपला विकास होईल, या आळशी व कामचुकार प्रवृत्तीतही आहे. 'योजना खाणे' या योजनेवर प्रहार करताना कवी म्हणतात,

'योजना शेतीची। राबविण्याआधी। खाऊ नये कधी। तेणे दुःख।।'

योजनांवर माणूस कधी जगू शकत नाही, तर त्याने लंगड्याला काठीचा आधार, असाच अर्थ योजनांचा घ्यावा व आपला विकास श्रमातून करावा. ही श्रमसंस्कृती रुजविण्याचे आवाहन कवीने केले आहे.

विवेकाने विज्ञानाचा अंगीकार केला पाहिजे, 'जुने ते केवळ सोने' म्हणून कवटाळण्यापेक्षा नवीनतेचा डोळसपणे स्वीकार करावा, हा विचार कवी देतो. विवाहातील मुहूर्ताचे बाळकडू जोपासण्यापेक्षा–

'विवाहापूर्वीच। वधू व वराने। आरोग्य चाचणी। करावीच।।'

हा आग्रह आवश्यक झाला आहे. कवीच्या नजरेतून आजचे शेतीवर अतिक्रमण करणारे यंत्रही सुटलेले नाही. आपण आज यंत्रयुगात वावरतो आहोत. यंत्राने माणसावर मात केली आहे. जागतिकीकरणासारखे यंत्रालाही आज नाकारता येत नाही. त्यामुळे जरी मनुष्य बेकार होत असला तरी अवघड कामे यंत्राने करावीत, कारण कामाचा वेग आणि पैशाची बचत परिणामी विकासाचा मार्ग प्रशस्त करणे होय. एकूणच शेतीमध्ये यंत्रांची अपरिहार्यता कवी मान्य करतो.

सध्याच्या काळात शेतकरी आणि आत्महत्या हे पर्यायी शब्द व्हावेत, एवढी आत्महत्येची समस्या वाढली आहे. जगाचा पोशिंदा आज आत्महत्या

करतो आहे. दुर्दैवाने याचे इतर वर्गाला आणि सरकारलाही गांभीर्य नाही. गेल्या दोन वर्षात (२०१४-२०१५) केवळ एकट्या महाराष्ट्रात ३०३० आत्महत्या झाल्या आहेत. शेतकरी कर्जामुळे आत्महत्या करतो, असे जरी असले तरी, ते एकमेव कारण नाही. तर त्याला आणखी बरीच कारणे आहेत. प्रामुख्याने व्यसनाधीनता, बेरोजगारी, दारिद्र्य, कौटुंबिकवाद, आजारपण, सरकारची उदासीन बेहिशोबी धोरणे, अज्ञान, अंधश्रद्धा, उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ न बसणे, निराशा, मुलांच्या रोजगाराचे, विवाहाचे, हुंड्याचे प्रश्न, अशी अनेक कारणे आहेत. यामध्ये हरवून बसलेला स्वाभिमान आणि ढासळत चाललेला आत्मविश्वास हेसुद्धा महत्त्वाचे आहे. सध्याची परिस्थिती ही कनिष्ठ शेती अशी निंदनीय झाली आहे. जोपर्यंत श्रेष्ठ शेती हा विश्वास, अभिमान, हा दर्जा प्राप्त होत नाही, आपल्या व्यवसायाबद्दल त्याला आदर वाटत नाही, तोपर्यंत शेतकरी म्हणून जगण्यात रस वाटणार नाही. खंगलेल्या नि खचलेल्या शेतकऱ्यांमध्ये स्वकर्तृत्वाने मोठे होण्याचे बळ, उमेद 'कुळवाडी अभंग' निर्माण करण्याचा प्रयत्न करते. शेतकऱ्यांच्या विकासाचा एका शेतकरीपुत्राने घेतलेला वसा, हा अत्यंत स्तुत्य आणि आशादायक आहे.

'कुळवाडी अभंग' हा जसा वैचारिक ठेवा आहे तसेच ते अभंग कलात्मकही आहेत. पुस्तकाच्या मुखपृष्ठापासून ते रेखाचित्रापर्यंतची मांडणी अत्यंत चपखल झाली आहे. मुखपृष्ठ बोलके आणि आशयाभिव्यक्तीला व्यक्त करण्यासाठी फार समर्पक झाले आहे. एकीकडे शेतकऱ्याची स्थिती ही जुवाला जुंपलेल्या बैलासारखी झाली आणि दुसरीकडे जगाचा पोशिंदा म्हणून पार पाडावयाची जबाबदारी, या दोहोंमधला संघर्ष, शेतकऱ्याने आचारावयाची तत्त्वे, स्वीकारायचे व्रत आणि करावयाचे कार्य, यांचा तपशील म्हणजे 'कुळवाडी अभंग' होय.

'कुळवाडी अभंगाची' भाषा ही चित्रमयी आहे, शब्दांच्या कुंचल्याने माधव जाधव चित्र रेखाटतात आणि वाचकांच्या डोळ्यासमोर ते ज्वलंत प्रसंग उभे करतात. उदा. घ्यायचे झाल्यास-

सांडपाणी सारे। एकाच ठिकाणी। बाहेर नेवोणी। साठवावे।।

किंवा

गुरे-ढोरे-शेळी। नको घरापुढे। डास आणि किडे। नको घरा।।


अशा अभंगांमधून मोहंजोदारो-हडप्पासारख्या आदर्श संस्कृतीचे चित्र

डोळ्यांसमोर तरळते तर 'बोऱ्या वाजणे' सारख्या शब्दप्रयोगामधून विस्थापनेची तीव्रता अधिक ठसठशीत व्यक्त होते.

'कुळवाडी अभंग' हा एकूणच शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणमीमांसा करून त्याला पुन्हा एकदा वैभवाकडे नेणारी 'कृषिगाथा' या योग्यतेचा आहे. शेतकऱ्याच्या मनावर अनास्थेची, अज्ञान व अंधश्रद्धेची साचलेली धूळ झटकून, पुन्हा नव्या तेजाने तळपता यावे, एवढी ऊर्जा व उमेद 'कुळवाडी अभंग' देते. मात्र, ज्यापद्धतीने शेतकऱ्यांच्या दुःख आणि आत्महत्यांसाठी तो स्वतः जबाबदार आहे. त्याचप्रमाणे काही प्रमाणात समाजाची शेतकऱ्यांविषयी नकारात्मकतेची, तिरस्काराची भावनाही जबाबदार आहे. तेवढीच राज्यव्यवस्थेची धोरणे आणि दृष्टिकोनही कारणीभूत आहे. शेतकऱ्यांच्या जबाबदारीची, कर्तव्याची जेवढ्या तीव्रपणे जाणीव माधव जाधव करून देतात, तेवढ्या तीव्रतेने सरकारच्या वेळखावू, आणि असहकारी धोरणांवर बोलत नाहीत, शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला सरकारी नीतीही जबाबदार आहे जर शेतकऱ्यांप्रति सरकार सकारात्मक असते तर स्वामीनाथन् आयोग लागू झाला असता, खर्चाचा भावासोबत ताळमेळ बसविला असता आणि योग्यवेळी योग्य भाव दिला असता. कीटकनाशकांच्या अतिरेकी फवारणीने जमिनीसोबतच आज माणसांचाही नाश होतो आहे आणि सरकार मात्र डोळे उघडे ठेवून तमाशा पाहत आहे. ही वेदना कीटकनाशक फवारणीने मृत्यू पावलेल्या माय-माउलींची आहे. शेतकऱ्यांच्या मानेवर कुऱ्हाडीसारखी बसलेली सरकारची धोरणे याबद्दल मात्र कवी फारसे लिहीत नाही, हा प्रश्न 'कुळवाडी अभंगाचा' नसला तरी शेतकऱ्यांच्या विकासाच्या वाटेतील ज्वलंत असल्याने याचे सुतोवाच यायला पाहिजे होते. कदाचित माधव जाधवांना केवळ शेतकऱ्यांची स्थिती-गती उन्नतीची केवळ शेतकऱ्यांच्याच संदर्भाने सांगायची असेल. हा अल्पसा दोष जर वगळला तर यातील एक-एक अभंग जर शेतकऱ्यांनी जगण्याचा भाग बनविला तर निश्चितच शेतकरी उन्नत झाल्याशिवाय राहणार नाही. याचा मला विश्वास वाटतो. शेतकऱ्याच्या सर्वांगीण दुःखाची कारणमीमांसा करून त्याच्या विकासाचा मार्ग प्रशस्त करणारा 'कुळवाडी अभंग' मराठी काव्यविश्वात स्वतंत्र स्थान निर्माण करेल, यात शंका नाही. यासाठीच प्रा. माधव जाधवांचे खास अभिनंदन!

प्रा. डॉ. गजानन रा. लोहवे
यवतमाळ, भ्र. ८२७५२९१४२०

■



2022-23

# Physical Education and Sports: Issue, Challenges and Opportunities

Volume I

Edited By : Dr. Sagar P. Narkhede

Published by : DnyanPath Publication

**Copyright © DnyanPath Publication, Amravati (INDIA)**

No part of this publication may be reproduced or distributed in any form or by any means, electronic, mechanical, photocopy, recording, or otherwise or stored in a database or retrieval system without the prior written permission of publishers. This edition can be exported from India only by the Publishers.

या संपादकीय ग्रंथात समाविष्ट सर्व संशोधनपर लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. समाविष्ट सर्व लेखांची जबाबदारी ही सर्वस्वी लेखकांची असेल.

# Physical Education and Sports: Issue, Challenges and Opportunities / Volume I

Edited By
Dr. Sagar P. Narkhede

Published by the **DnyanPath Publication (INDIA)**
A Leading **National Books Publishing** House In India
The First edition published in June 2023

**ISBN 13 : 978-81-19435-02-9**

ISO 9001 : 2015

ज्ञानपथ® पब्लिकेशन

Visit us
www.dnyanpath.org

**Reg. Office** : FFS-A, Block C,First Floor, Venus Plaza, Shegaon Naka, V.M.V. Road, Amravati - 444 603 (MH)
**Branch Office** : Kalash Apartment, Near Gulmohar Holl, Pande Layout Khamla Nagpur - 440 025 (MH)
**Visit us** : www.dnyanpath.org
**Contact us** : dnyanpathpub@gmail.com
**Phone** : 08600353712, 09503237806
**Printed at Shri Gurudeo Printers, Amravati.**
Mahatma Fule Sankul, Shegaon Naka,
V.M.V. Road, Amravati - 444603 (Maharashtra)

**₹ : 800/-**

## - INDEX -


| | | |
|---|---|---|
| 1. | **The Computer: Use In Games And Sports**<br>Dr. Vishakha S. Saoji | 1 -2 |
| 2. | **Characteristics & Components of Quality Physical Education**<br>Dr. Alka Karanwal | 3 - 4 |
| 3. | **Sports Overtraining: Treatments and Preventative Measures**<br>Prof. Dr. Narendra U. Patil | 5 - 7 |
| 4. | **Sports Overtraining: Treatments and Preventative Measures**<br>Dr. Narendra U. Patil | 8 - 10 |
| 5. | **The Study Of The Role Of Social Media In Physical Education And Sports**<br>Dr. B. V. Shrigiriwar | 11 - 15 |
| 6. | **Yoga For Human Sensitivity Development**<br>Dr. Devender Kumar | 16 - 19 |
| 7. | **Challenges Ofphysical Education And Sports In India: An Overview Study**<br>Dr. Lt Gayatri Pandey<br>Dr. Samit Saibya | 20 - 25 |
| 8. | **Assess And Compare The Selected Psychological Profile Self-confidence Of Kabaddi And Kho-kho Players.**<br>Dr. Srinivasa | 26 - 29 |
| 9. | **Physical Education & Sports: Issues, Challenges & Opportunities**<br>Dr. Alka Anil Thodge | 30 - 31 |
| 10. | **Challenges And Issues :In Front Of Physical Education In Today's Schools**<br>Prof. Dr. Anil Vaidya | 32 - 34 |
| 11. | **Tools And Gadgets In Sports: Emerging Technology And Trends**<br>Prof. Anjali Digambar Barde | 35 - 37 |
| 12. | **Current Trends In Physical Education & Sports**<br>Dr. Ankit Sneh | 38 - 42 |
| 13. | **Rise in Use of ICT in Sports and Physical Education**<br>Dr. Prof. Ashish Govindrao Barde | 43 - 46 |

14. Women In Sports India: An Overview Study — 47 - 48
Dr. Ashwani Kumar

15. Global Mental Health, Peace and Sustainability Through Yoga — 49 - 52
Dr. Avinash Vitthalrao Kharat

16. Modern trends in physical education and their future prospectsy — 53 - 55
Dr. Ulhas V. Bramhe

17. Future Research And Enrichment In Sports: Technology In Modern Era — 56 - 59
Dr. Sudhir W. Khade

18. The Importance of Fitness, Health & Wellness for Healthy Living — 60 - 63
Dr. Sunil S. Bhotmange

19. Study of Post-lockdown Depression of College Students during COVID – 19 Pandemic — 64 - 66
Dr. Dharti Savani

20. Challenges and opportunities in front of physical education and sports. — 67 - 76
Dr. Dnyaneshwari S. Wankhade

21. Harnessing the Power of Sports for India's Socio-Economic Development: A Multi-Dimensional Examination of Challenges and Policy RecommendationsFootball Playlrs At Different Levela of Achievemeat — 77 - 78
Dr. Seema

22. Physical Education And Sports: Indian Society And Its Challenges — 79 - 81
Dr. Jaikumar G. Kshirsagar

23. Physical Inactivity: Challenges For Poor Health — 82 - 83
Prof. Syed Anisoddin

24. मानवी शारीरिक आरोग्य व रोग निर्मिती — 84 - 85
प्रा. अभय श. चांदेकर

25. महाविद्यालयीन स्तरावरील ग्रामीण शहरी विद्यार्थ्यांमध्ये ध्यान साधनेचा त्यांच्या एकाग्रतायताण तणाव यांच्याशी असलेला सहसंबंधाचा अभ्यास — 86 - 89
प्रा. सौ. क्रांती संदेश क्षीरसागर

26. शारीरिक शिक्षा व पर एक अध्ययन और अकादमिक की प्रदर्शन पर इसका प्रभाव — 90 - 93
Mr. Sunil Kumar

# मानवी शारीरिक आरोग्य व रोग निर्मिती

**प्रा. अभय श. चांदेकर**
संचालक, खेळ व शारीरिक शिक्षण
बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय,
पारवा जि. यवतमाळ.

आपले शरीर संपुर्णत: निरोगी असणे हिच आरोग्याची गुरूकिल्ली आहे. या करीता शरीराची अधिकाधिक माहिती करून घेणे व ते निरोगी कसे राहील याची दक्षता घेणे गरजेचे आहे. मानवी शरीरात इंद्रियांच्या रुपात असणारी यंत्रे नाजुक असुनही टिकाऊ आहेत. हे शंभर वर्षांपर्यंत अखंडितपणे कार्य करतात. आज मानव शरीर व मन व्याधिमुक्त ठेवण्यास निसर्ग व सृष्टिकर्त्यावर विसंबून नाही. त्याकरीता वेगवेगळे व्यायाम प्रकार व औषधोपचार प्रचलीत आहेत. शरीर रोगमुक्त राखण्यास याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. आहार, व्यायाम व विश्रांती योग्य प्रमाणात असल्यास शारीरिक आरोग्य चांगले राहते. परंतु यामध्ये अनियमितता अथवा चुक केली तरच शारीरिक व्याधी जडतात. याचे नियम पाळलेच पाहिजेत. नियमाची पायमल्ली केली की शरीरात रोग निर्माण होणारच. आपल्या शरीरात पृथ्वी, आकाश, तेज, वायु, व जल ही पंचमहाभूते असतात. या पाचही गोष्टींचे संतुलन कायम राखण्यासाठी ऋतुमानाप्रमाणे आहार घेतला पाहिजे. परंतु शारीरिक हालचाली अथवा व्यायाम कोणत्याही ऋतुत करता येतोच.

## समतोल आहार

समतोल आहारात प्रथिने, स्निग्ध पदार्थ, जिवनसत्वे, खनिजद्रव्ये व पाणी या घटकांचा प्रमाणात समावेश असावा लागतो. एखादा घटक कमी प्रमाणात घेतला तरच शरीराच्या तक्रारी सुरु होतात. या तक्रारीचे प्रमाण वाढले म्हणजेच शरीरास रोग जडणे होय शरीराचे सर्वच अवयव स्वयंपणे कार्य करणारे आहेत. जोपर्यंत त्यांना रक्त व प्राणवायूचा पुरवठा पुरेसा प्रमाणात होईल तोपर्यंत ते योग्य रीतीने कार्य करीत राहतात. शरीर यंत्रणा योग्यरीतीने चालण्यास फुफ्फुसे (श्वसनसंस्था) व पोट (पचनसंस्था) महत्वाच्या आहेत. याच दोन संस्थांच्या 'मध्य'तून रोगजंतूचा शिरकाव होण्याची फार मोठी शक्यता असते. व फुफ्फुसात प्राणवायूच्या योग्य पुरवठयासाठी 'प्राणायम' करणे अतीयोग्य ठरते. श्वासोच्छासाचे नियंत्रण म्हणजेच प्राणायम म्हणता येईल.

## रक्ताभिसरण

शरीरात शुध्द रक्त तयार होणे आवश्यक आहे. सेवन केलेल्या अन्नाचे व पेयाचे पचन होवून त्यातून रक्त तयार होते. याकरीता पचनसंस्थेची योग्य दक्षता घेणे ही अत्यंत आवश्यक आहे. ग्रहण केलेले अन्न दाताने चावून त्यात लाळ मिसळली जाते. अन्न पुर्णत: चावल्याशिवाय घाईघाईने जेवतात व प्रमाणाबाहेर पिष्टमय पदार्थ सेवन करतात ते सर्व मधुमेह व स्थुलत्वाला निमंत्रण देतात. आहारात गोड, खारट, आंबट, तिखट, तुरट, व कडू हे स्वादरस असावे. तुरट व कडू रसांमुळे गोड पदार्थांचे दुष्परिणाम नाहीसे होतात व रक्त शुध्द होते. पाचकशक्ती वाढते व जठराग्नी प्रज्वलीत होते. आहारात सर्व पोष्टीक पदार्थांचा समावेश असावा तसेच व्यसनांमुळे बाधक पदार्थांचे सेवन करणेही शरीरास अपायकारक असतेच. धुम्रपान, मद्यपान, तंबाखु, गुटखा, नशेचे ड्रग, यासारखी दुर्व्यसने जडवून घेणे म्हणजेच शारीरिक रोगाला आमंत्रण देणे हे निश्चित. रक्ताभिसरण सुरळीत होण्याकरीता खेळणे, धावणे, चालणे, अशा व्यायामांची आवश्यकता असते.

## रोग निर्मिती

शरीराच्या कोणत्याही अवयवाकडून प्रमाणाबाहेर परिश्रम करवून घेतल्यास व आरोग्य विषयक नियमांकडे दुर्लक्ष केल्यास शारीरिक रोगांची सुरुवात होते. या रोगांचे स्वरूप पुढिल प्रमाणे आहे.

- लघवी कमी होणे, म्हणजेच शरीरात विषारी द्रव्ये साठू लागणे.
- जठरातील उष्णता कमी होणे, भुक मंदावणे म्हणजेच पचनक्रीया बिघडणे होय यातून बध्दकोष्ठता अथवा अतिसार रोग उद्भवतात.
- विषम आहाराने रक्त दुषित 95/105
अवयवांचे दुखण्याचे कारण
ऑक्साईड

व विषारी द्रव्ये निर्माण होतात. हे अवयवांना पुनकार्यक्षम होवू देत नाही.

- ❖ शारीरिक तक्रारी म्हणजेच शरीराची क्षमता कमी होणे होय. क्षमता कमी झाल्यास शरीरात रोगजंतूचा प्रभाव वाढतो व रोग निर्माण होतात. अंतस्त्राव ग्रंथीत बिघाड निर्माण होतो.
- ❖ अन्नाचे पचन होयून निरूपयोगी अन्न विषारीद्रव्य व रोगजंतू गुदद्वार व लघवी द्वारे बाहेर टाकणे आवश्यक आहे. या क्रियात बिघाड झाल्यास बद्कोष्टता, गॅसेस, किडनिचे आजार उद्भवतात.
- ❖ तहान, भुक, लघवी, शौच याची सूचना शरीर देते त्याच वेळी सेवन व उत्सर्जन करणे आवश्यक असते. याच्या वेळा न पाळणे म्हणजेच रोगास आमंत्रण देणे होय. पोट भरल्याची सूचना ढेकर आल्याने कळते तेव्हा अधिक अन्न ग्रहण टाळावे.
- ❖ शरीराच्या कोणत्याही भागाचे दुखणे म्हणजेच त्या भागात कार्बनडाय ऑक्साईड वायु, पाणी, हवा, अनावश्यक साचले असल्याची ती सूचना असते.
- ❖ नाकातून पाणी वाहने शिंका येणे म्हणजेच शरीरातील अधिक पाणी बाहेर टाकण्याची आवश्यकता आहे.
- ❖ खोकला येतो तेव्हा छातीत गळ्यात साठलेला क' बाहेर टाकण्याची आवश्यकता असते.
- ❖ शरीराच्या कोणत्याही भागात अधिक रक्त प्रवाहाची आवश्यकता असते तेव्हा त्या जागी कंड सूटते.
- ❖ शरीरात शिरलेल्या रोगजंतूशी श्वेतपेशींची लढाई सुरू असल्यास ताप येतो.

उपरोक्त शारीरिक लक्षणांवरून त्या स'स्येचे त्वरीत निराकरण करणे गरजेचे असतेच. त्याकरीता पोषक आहार, विश्रांती याचसह प्राणायम, योगासने, धावणे, चालणे, फिरणे, पोहणे, खेळणे, व्यायाम करणे, ऐरोबिक्स, या प्रकारच्या शारीरिक हालचाली नियमि केल्यास शरीरातील क्रीया सुरळीत पार पडतात व शारीरिक अवयव व स्नायुची क्षमता वाढवितात.

**संदर्भ ग्रंथ**


१. अशोक महादेव जोशी, मंजूषा जोशी 'आयुर्वेदिक औषधी कृतींचा वर्गीकृत'बृहन्निघंटु'' भारतीय संस्कृतीकोश मंडळ पुणे जाने. २००३

२. डॉ. राजेश्वरी 'प्राकृतिक चिकित्साम पुस्तक महल, नवि दिल्ली जुलै १९९९.

३. डॉ. प. म. आलेगांवकर 'तुमचा व्यायाम तुमचे आरोग्य' राजेश प्रकाशन पुणे ३८.

४. प्रा. पु.के. चितळे 'तुमची ओळख तुमच्याशीच' मन पब्लिकेशन्स पुणे ३०. ऑगष्ट २००२.

५. देवेंद्र वोरा, आत्माराम शेट्ये, 'आपले आरोग्य आपल्या हातात' नवनीत प. मुंबई १९८२.

६. प्रा. त्रिवेणी मरकाडे, सुलभा गोंगे. 'पोषण आणि आहारशास्त्र' पिंपळापुरे प. नागपूर २०१०


***



# *About Editor*

Dr. Sagar Pralhadrao Narkhede, presently working as Director of Physical Education & Sports at Saraswati Arts College, Dahihada, Tq. Dist. Akola affiliated to S.G.B. Amravati University, Amravati Since 2009. He has done M.A., M.P.Ed., M.Phil, PH.D., NET, SET, N.I.S., D.J.. He has received Maharashtra Guru Gaurav Award, Adarsh Teacher Award & Best Sports Sanghatak Award by Government of Maharashtra. He has also received Dr. G. P. Gautam Award for Best Physical Education Teacher from Physical Education Foundation of India, New Delhi. Besides, he has published 44 Research Papers out of which 19 are published at International level. He has also published one book. He is recognized as Research Guide in Physical Education. He has work as a Organizing Committee Member & Official in various tournaments. He has acted as Chairperson & Resource Persons at various conferences & seminars. He has also performed duties as Coach, Manager and Member of Selection Committee in various level tournaments. Under his Coaching Indian Handball Team Has Won Gold Medal against Pakistan at Faisalabad, Pakistan.

₹.: 800/-

ISBN 978-81-19435-00-5

DnyanPath Publication®

ISO 9001 : 2015

A Leading National Books Publishing House In India

www.dnyanpath.org